महाराष्ट्र शासन
जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा
जुने नियोजन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, भंडारा- ४४१९०४
दुरध्वनी क्र. ०७१८४-२५२२५७
ई-मेल : dio.bhandara@gmail.com

वृत्तपत्र प्रतिक्रिया

वृत्तपत्राचे नावः दै. लोकशाही वार्ता (पृष्ठ क्र २) दिनांक : २०/४/२०२३

# मानवी तस्करी रोखण्यासाठी आंतरराज्यीय वाहतुकीवर नजर ठेवा

## महिला आयोगाचे निर्देश : बालविवाह प्रतिबंधासाठी कडक कारवाई करा

**लोकशाही वार्ता / भंडारा**

महिलांवरील अत्याचार दूर करणे आणि बालके व महिलांच्या तस्करीला आळा घालणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. मानवी तस्करीमध्ये स्त्रिया व बालके यांची संख्या लक्षणीय आहे. हे रोखण्यासाठी भंडारा जिल्ह्यातील सीमालगतच्या आंतरराज्यीय वाहतुकीवर बारकाइने लक्ष ठेवण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी बुधवारी पोलिस विभागाला दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज महिला व बालविकास विभाग, वात्सल्य योजनेचा तसेच महिलाविषयक योजनांचा विस्तृत आढावा घेतला.

यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य आभा पांडे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, पोलिस अधीक्षक लोहित मतानी, महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त अपर्णा कोल्हे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तुषार पौनीकर आदी मंचावर उपस्थित होते. बँक ऑफ इंडियातर्फे आंरसेटी मार्फत महिलांना विविध प्रशिक्षणाव्दारे आर्थिक निर्भर करण्याचा प्रयोग हा प्रशंसनीय असून राज्यस्तरावर हा उपक्रम राबविण्याबाबत आयोग शासनाला सूचना करेल, असे त्यांनी सांगितले. २०२१ च्या सर्वेक्षणात दक्षिण आशियामध्ये दीड लाख मानवी तस्करीची प्रकरणे पुढे आली. यामध्ये बांग्लादेश, नेपाळ, भुटान यांच्यापाठोपाठ भारताचाही क्रमांक लागतो. भारतात मानवी तस्करीच्या प्रकरणात महाराष्ट्राचा चौथा क्रमांक लागतो. ही गंभीर बाब असून महिला आयोग, पोलिस प्रशासन, विविध सामाजिक संस्था यांच्यासोबतच समाजाच्या विविध घटकांनीही एकत्ररित्या कार्यकरण्याची गरज असल्याचे चाकणकर यांनी सांगितले. यावेळी महिला व बालकांसाठीच्या पोलिस विभाग, महिला व बालकल्याण तसेच आरोग्य विभाग, परिवहन महामंडळ आणि जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा विस्तृत आढावा त्यांनी घेतला. माता, भगीनींसाठी कार्य करतांना अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. महिलांना समाजात सुरक्षित वातावरण मिळाले पाहीजे यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे चाकणकर यांनी सांगितले. येणाऱ्या जून महिन्यात पुन्हा राज्य महिला आयोग भंडारा जिल्ह्यातील कामाचा आढावा घेईल, असे ही त्यांनी बैठकीत सांगितले.



महाराष्ट्र शासन
## जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा
जुने नियोजन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, भंडारा- ४४१९०४
दुरध्वनी क्र. ०७१८४-२५२२५७ ई-मेल : dio.bhandara@gmail.com

### वृत्तपत्र प्रतिक्रिया

वृत्तपत्राचे नाव: दै. दैनिक भास्कर (पृष्ठ क्र ३) दिनांक : 20/4/2023



# बाल विवाह रोकने कड़ी कार्रवाई करें

## ▪ राज्य महिला आयोग की अध्यक्ष चाकनकर ने दिए बैठक में निर्देश

ब्यूरो | भंडारा

महिलाओं पर होने वाले अत्याचार दूर करने तथा बच्चों व महिलाओं की तस्करी रोकना यह राज्य शासन की प्राथमिकता है। मानवी तस्करी में महिलाएं व बच्चों की संख्या अधिक है। इस रोकने के लिए भंडारा जिले के सीमा के तहत अंतरराज्यीय वहन पर बारीकी से ध्यान दें। साथ ही बाल विवाह रोकने के लिए कड़ी कार्रवाई करें। यह निर्देश राज्य महिला आयोग की अध्यक्ष रुपाली चाकनकर ने पुलिस को दिए।

जिलाधिकारी कार्यालय के जिला नियोजन समिति के सभागृह में बुधवार, 19 अप्रैल को महिला व बाल विकास विभाग, वात्सल्य योजना तथा महिला विषयक योजनाओं का विस्तृत जायजा लिया गया।

इस समय राज्य महिला आयोग की सदस्य आभा पांडे, जिलाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, जिला पुलिस अधीक्षक लोहित मतानी, महिला व बाल विकास विभाग के उपायुक्त अपर्णा कोल्हे, जिला महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनीकर मंच पर उपस्थित थे। चाकनकर ने कहा कि बैंक आफ इंडिया द्वारा आरसेटी की महिलाओं से जुड़े विविध प्रशिक्षण का प्रयोग सराहनीय होकर यह उपक्रम राज्यस्तर पर चलाने के लिए आयोग शासन को सूचित करेगा। वर्ष 2021 के सर्वेक्षण में डेढ़ लाख मानवी तस्करी के मामले सामने आए थे। इसमें बांग्लादेश, नेपाल, भुटान व भारत का समावेश है। भारत में मानवी तस्करी के महाराष्ट्र का चौथा क्रमांक है।

शेष | पेज 14 पर

**बाल विवाह रोकने कड़ी...**

यह गंभीर मुद्दा होकर महिला आयोग, पुलिस प्रशासन, विविध सामाजिक संस्था के साथ विविध घटकों ने एकजुट होकर इस रोकने के लिए कार्य करने का आह्वान चाकनकर ने किया। इस समय महिला व बालकों के लिए पुलिस विभाग, महिला व बाल कल्याण तथा स्वास्थ्य विभाग, परिवहन महामंडल एवं जिला प्रशासन द्वारा चलाएं जाने वाली योजनाओं का जायजा लिया गया। माता व बहनों के लिए कार्य करते समय अधिकारियों ने संवेदनशीलता से काम करने का आह्वान चाकनकर ने किया। महिलाओं को समाज में सुरक्षित वातावरन मिलने के लिए मानसिकता बदलने की आवश्यकता है। जून माह में राज्य महिला आयोग फीर से कामों का जायजा लेगा यह बात सभा में कही गई।

महाराष्ट्र शासन

जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा

जुने नियोजन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, भंडारा- ४४१९०४

दुरध्वनी क्र. ०७१८४-२५२२५७ ई-मेल : dio.bhandara@gmail.com

## वृत्तपत्र प्रतिक्रिया

वृत्तपत्राचे नाव: दै. महाराष्ट्र (पृष्ठ क्र 7) दिनांक : 20/8/2025

**सूचना • महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांचे निर्देश; माध्यमांशी साधला संवाद**

# महिलांशी संबंधित डेटा 2 महिन्यात संकलित करा

भंडारा, ब्युरो. महिलांचे प्रश्न, त्यांच्या समस्या निराकरणासाठी सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील महिला संबंधित माहिती संकलित करून ठेवावी. समस्यांची समीक्षा करण्यासाठी डेटा महत्त्वपूर्ण असतो. यासाठी एनजीओची मदत लागली तर ती घ्या.

परंतु, 2 महिन्याच्या आत ही माहिती संकलित करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिले. नियोजन भवनात आढावा बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, महिलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असून हा प्रकार चिंतेचा आहे. महिला हिंसा व मुले आणि महिलांची तस्करी रोखणे ही राज्य सरकारची प्राथमिकता आहे. ओमान आणि दुबई या देशात काम करण्यासाठी गेलेल्या दीड हजाराहून महिला बेपत्ता आहेत.

मानव तस्करीत महिला आणि मुलांची संख्या भंडारा जिल्ह्यात अधिक आहे. हे रोखण्यासाठी पोलिस विभागाने भंडारा जिल्ह्याच्या सीमेवर आंतरराज्यीय वाहतुकीवर बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश दिले.

## 705 तक्रार निवारण कमिटी



शासकीय आणि निमशासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी तक्रार निवारण कमिटी तयार करण्याच्या आदेशानुसार जिल्ह्यात एकूण 1,961 कार्यालयात 705 समिती गठित आहेत. सेवा पुरवठादार आस्थापनेत समिती गठित नसून उर्वरित 1,255 कार्यालयात 10 पेक्षा कमी महिला कर्मचारी असल्यामुळे समिती स्थापन करणे बंधनकारक नाही.

## प्रशासनाच्या कार्याचे कौतुक

पूरपीडित महिलांना मदत केल्याबद्दल आणि आरसेटी प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकरित्या निर्भर बनविण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल चाकणकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्याची प्रशंसा केली. हा पॅटर्न राज्यात राबविण्यासाठी आयोग सरकारकडे शिफारस करेल. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य आभा पांडे, सीईओ समीर कुर्तकोटी, पोलिस अधिक्षक लोहित मतानी, महिला व बालविकास विभाग उपायुक्त अपर्णा कोल्हे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तुषार पवनीकर, जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ उपस्थित होते.